20 OCT 2025
पुढारी



कोल्हापूर : जागतिक अन्न दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी पोस्टर सादरीकरण करून सकस अन्नाचे महत्त्व सांगितले.

# जागतिक अन्न दिनानिमित्त पोस्टर सादरीकरण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जागतिक अन्न दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या अन्न विज्ञान व तंत्रज्ञान अधिविभागातर्फे 'शाश्वत अन्न व्यवस्था' या संकल्पनेवर विशेष पोस्टर सादरीकरण व प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमात विभागाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी एकूण ३० माहितीपर पोस्टर सादर करत अन्न, कृषी व संबंधित अन्न विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील शासकीय व अशासकीय संस्था, केंद्रीय मंत्रालये, ग्राहक हक्क संरक्षण तसेच विविध शैक्षणिक संस्थांची सखोल माहिती प्रदर्शित केली. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी भरडधान्यापासून तयार केलेल्या विविध पौष्टिक पदार्थांचे प्रदर्शन व विक्रीचे स्टॉलही मांडण्यात आले होते.

उपक्रमाचे उद्घाटन कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते आणि वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. या सादरीकरणामध्ये अन्न उत्पादन, वितरण आणि व्यवस्थापनाच्या शाश्वत पद्धतींबाबत सर्वसामान्यांमध्ये जनजागृती करणाऱ्या पोस्टर्सचा समावेश होता.

अधिविभाग प्रमुख डॉ. प्रवीणकुमार पाटील यांनी सामाजिक व पर्यावरणीयदृष्ट्या जबाबदार वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याचा हेतू या आयोजनामागे असल्याचे सांगितले. डॉ. अभिजित गाताडे यांनी आभार मानले.

20 OCT 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात फूड बिझनेस जागृती कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या अन्न विज्ञान व तंत्रज्ञान अधिविभागातर्फे विद्यापीठातील विद्यार्थी व परिसरातील फूड बिझनेस ऑपरेटर यांच्यासाठी मार्गदर्शनपर कार्यशाळा उत्साहात झाली. जागतिक अन्न दिनानिमित्त या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते.

कार्यशाळेत अन्नसुरक्षा व आरोग्य यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी सूक्ष्मजीवशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. पी. के. पवार यांनी मार्गदर्शन केले. अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहआयुक्त यू. एस. लोहकरे यांनी नफेखोरीसाठी केली जाणारी भेसळ व ती भेसळ कशी ओळखावी, याची माहिती दिली. अन्नसुरक्षा अधिकारी विजय पाचपुते यांनी एफएसआय परवाना व एफडीएच्या कामकाजाची माहिती दिली. अन्नशास्त्र व तंत्रज्ञान अधिविभागाच्या एम. एस्सी. भाग दोनच्या विद्यार्थिनींनी एडिबल ऑईलबाबत सादरीकरण केले. कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, अन्नपदार्थांची नैसर्गिकता लुप्त होत आहे. नैसर्गिक चव, तसेच लोकांची अन्नपदार्थांविषयी संकल्पना बदलत आहे. अन्न विज्ञानाच्या विद्यार्थ्यांची शाश्वत अन्नप्रणालीमध्ये भविष्यात मोठी भूमिका असणार आहे. प्रास्ताविक डॉ. प्रवीणकुमार पाटील यांनी केले. डॉ. अभिजित गाताडे यांनी कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाचा आढावा डॉ. हर्षवर्धन कांबळे यांनी सादर केला. डॉ. अश्विनी देशमुख यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी हर्षद कांबळे, वैभव बागे यांचे सहकार्य लाभले.

20 OCT 2025
सकाळ



कोल्हापूर : दिवाळीच्या पूर्वसंध्येला दीपोत्सव साजरा करताना शिवाजी विद्यापीठात शिकणाऱ्या परदेशातील विद्यार्थिनी.

# परदेशी विद्यार्थ्यांचा विद्यापीठात दीपोत्सव

## पारंपरिक पोशाख, दिवे, रांगोळीसह सांस्कृतिक कार्यक्रमांतून आनंदोत्सव

कोल्हापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय विद्यार्थी, विद्यार्थिनींनी दिवाळीच्या पूर्वसंध्येला विद्यापीठ परिसरात पारंपरिक पद्धतीने दिवाळी साजरी केली. विविध देशांतून शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीचा अनुभव घेत पारंपरिक पोशाख, दिवे, रांगोळी व सांस्कृतिक कार्यक्रमांच्यां माध्यमातून आनंदोत्सव साजरा केला.

यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्राचे समन्वयक डॉ. एस. बी. सादळे, मीना पोतदार, विद्युत अभियंता अमित कांबळे उपस्थित होते. विद्यापीठात सध्या दक्षिण आफ्रिका, सुदान, मालावी, तुवालू, फिजी, पेरू, मॉरिशस, इंडोनेशिया, मादागास्कर, बांगलादेश, नेपाळ या देशांतील विद्यार्थी विविध अधिविभागांत उच्चशिक्षण घेत आहेत. विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थी वसतिगृहात राहणाऱ्या या विद्यार्थ्यांना भारतीय परंपरा, सणांमध्ये सामावून घेतले जाते. दिवाळीच्या पूर्वसंध्येला साजऱ्या करण्यात आलेल्या या दीपोत्सवात विद्यार्थ्यांनी पारंपरिक गाणी आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. दिवे, पणत्या प्रज्वलित करत दिवाळीचा सण साजरा केला. यावेळी उपस्थितांना आपला परिचय करून देत आपले विद्यापीठातील अनुभव सांगितले.

**सांस्कृतिक कार्यक्रमाने जिंकली मने**

दिवाळीच्या पूर्वसंध्येला साजऱ्या करण्यात आलेल्या या दीपोत्सवात विद्यार्थ्यांनी पारंपरिक गाणी आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. दिवे, पणत्या प्रज्वलित करत दिवाळीचा सण साजरा केला. यावेळी उपस्थितांनी आपला परिचय करून देत आपले विद्यापीठातील अनुभव सांगितले.

20 OCT 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ग्रामीण महिलांच्या पारंपरिक ज्ञानाची दखल घ्या

## ज्येष्ठ लेखिका संध्या नरे-पवार : शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर, ता. १९ : 'ग्रामीण महिलांकडे श्रम आणि कौशल्यावर आधारित पारंपरिक ज्ञान आहे. त्याची दखल घेणे आवश्यक आहे. ज्ञान, कौशल्य आणि व्यवस्थापनाचे धडे स्त्रियांकडून घेतले पाहिजेत,' असे मत ज्येष्ठ लेखिका, स्त्रीवादी अभ्यासक संध्या नरे-पवार यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या इतिहास विषयांतर्गत जागतिक ग्रामीण महिलादिनानिमित्त आयोजित ऑनलाइन व्याख्यानात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी संचालक डॉ. कृष्णा पाटील होते.

'आजची शेती यांत्रिकीकारणामुळे संकटात आली. शेती वाचवायची असेल आणि शेतकरी आत्महत्या थांबवायच्या असतील तर शेतकरी म्हणून स्त्रियांना ओळख मिळावी. स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवता कामा नये. शिक्षण आणि स्त्रियांच्या पारंपरिक ज्ञानाची सांगड घातली पाहिजे. त्यांच्या उत्पादनाला बाजारपेठ मिळावी. स्त्रियांचे ज्ञान हे कौशल्यावर आधारित आहे. त्याचे आपण मूल्य केले पाहिजे. त्यांच्या ज्ञानाचे संरक्षण ग्रामपंचायत ते सरकार या पातळीवर केले पाहिजे,' असे नरे-पवार यांनी सांगितले.

ग्रामीण महिलांचे पारंपरिक ज्ञान आजच्या काळात उपयोगात आणणे महत्त्वाचे आहे. ग्रामीण महिलांच्या पारंपरिक ज्ञानातील माहिती, कौशल्य व व्यवस्थापन विचारात घेणे आवश्यक असल्याचे डॉ. पाटील यांनी सांगितले. यावेळी उपकुलसचिव विनय शिंदे, प्रा. डॉ. राम चट्टे, कांचन खराटे, चांगदेव बंडगर उपस्थित होते. डॉ. मुफिद मुजावर यांनी प्रास्ताविक केले. बबन पाटोळे यांनी आभार मानले.